# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, फ प्रभाग कार्यालय
## कार्यपत्रिका क्रमांक ७
## सभावृत्तांत

दिनांक:- ११ / ९ / २०१५ वेळ. दुपारी १२.०० वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची फ प्रभाग समितीची मासिक सभा दिनांक ११ / ९ / २०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता फ क्षेत्रीय कार्यालयातील “राजर्षी शाहु महाराज सभागृहात” आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. बो-हाडे शुभांगी संजय | अध्यक्षा |
| २. | मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे | सदस्या |
| ३. | मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ | सदस्य |
| ४. | मा. भालेकर अरुणा दिलीप | सदस्या |
| ५. | मा. स्वाती प्रमोद साने | सदस्या |
| ६. | मा. जाधव साधना रामदास | सदस्या |
| ७. | मा. जाधव राहुल गुलाब | सदस्य |
| ८. | मा. बहिरवाडे नारायण सदाशिव | सदस्य |
| ९. | मा. पवार संगीता शाम | सदस्या |
| १०. | मा. (चिखले) मराठे अश्विनी अजित | सदस्या |
| ११. | मा. मासुळकर समीर मोरेश्वर | सदस्य |
| १२. | मा. भालेकर पंकज दत्तात्रय | स्विकृत सदस्य |
| १३. | मा. पवार जितेंद्र हनुमंत | स्विकृत सदस्य |

याशिवाय श्री.विजय वाघमारे प्रशासन अधिकारी तथा सभासचिव, श्री.प्रकाश देशमाने (कार्यालयीन अधिक्षक), श्री. सतिश इंगळे कार्यकारी अभियंता (स्थापत्य), श्री.संदेश चव्हाण कार्यकारी अभियंता (विद्युत), श्री.पांडुरग जाधव (लेखाधिकारी), डॉ.सतिश गोरे (पशु वैद्यकीय अधिकारी), श्री. तानाजी दाते (सहा.आरोग्य अधिकारी), श्री. हनुमंत शिंदे उपअभियंता (जलनि:सारण), श्री.नरोटे एस.एल. उपअभियंता (स्थापत्य), श्री. आडसूळे अशोक प्र. उपअभियंता (विद्युत), श्री.प्रदीप पुजारी उप अभियंता (झोनिपू) श्रीम.प्रभावती गाडेकर (कार्यालयीन अधिक्षक) इ. अधिकारी सभेस हजर होते.

सभापती यांनी सर्वांचे स्वागत करुन सभा सुरु करावी असे सांगितले. दि.१५ / ७ /२०१५ व १४ /८ /२०१५ (कार्यपत्रिका क्र.४ व कार्यपत्रिका क्र.५) चा सभावृत्तांत कायम करणेत आला.

खालीलप्रमाणे सूचना मांडण्यात आली.

सुचक:- मा.स्वाती साने अनुमोदक:- मा.पौर्णिमा सोनवणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे विद्यमान नगरसदस्य कै. अविनाश टेकावडे, सुप्रसिध्द संगीतकार आदेश श्रीवास्तव, ज्येष्ठ पुरोगामी विचारवंत श्री. कलमुरगी आणि माजी नगरसेवक कै. भिमराव पाटोळे, यांचे दु:खद निधन झालेले असलेने, या मान्यवरांना आजच्या मासिक सभेत श्रध्दांजली वाहणेत यावी. असे सांगितले.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

मा.अध्यक्षा यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्र.१ निगडी येथे मुंबई-पुणे रस्त्यावर फ्लाय ओव्हर (पादचारी रस्ता) बनविणेबाबत**
मा.समीर मासुळकर व मा.पौर्णिमा सोनवणे यांचा प्रस्ताव

विषय क्र.२ प्रभाग क्र.५ मधील से.क्र.१३ हा भाग फ प्रभागात येतो. तेथे अनेक वर्षापासुन रहिवासी राहतात तरी त्या भागाचे “**राजमाता जिजाऊ नगर**” असे नामकरण करणेबाबत
मा.साधना जाधव व मा. आश्विनी चिखले यांचा प्रस्ताव

विषय क्र.३ प्रभाग क्र.९ संभाजीनगर येथील अम्ब्रेला गार्डन मधील नविन इमारतीमध्ये महापालिकेमार्फत दवाखाना सुरु करण्याचे नियोजन केले आहे. सदर नियोजीत दवाखान्यास “**साईअम्ब्रेला डिस्पेन्सरी**” असे नामकरण करणेबाबत
मा.शुभांगी बो-हाडे व मा.स्वाती साने यांचा प्रस्ताव

ठराव क्र.१५ विषय क्र.१
दि.११/९/२०१५ विभाग:-
**सुचक**:- मा.मासुळकर समीर मोरेश्वर अनुमोदक:- मा. पौर्णिमा रविंद्र सोनवणे
संदर्भ:- मा.जिंतेद्र हनुमंत पवार यांचा दि. ११/९/२०१५ चा प्रस्ताव
विषय:- निगडी येथे मुंबई- पुणे रस्त्यावर फ्लाय ओव्हर (पादचारी रस्ता) बनविणेबाबत

निगडी येथे मुंबई – पुणे रोडच्या पलिकडे विद्यानंद इंग्रजी माध्यम शाळा तसेच कै. मधुकर पवळे शाळा पिं. चिं. म.न.पा. व सेंट उर्सुला शाळा असल्याने विद्यार्थ्यांना व पालकांना अतिशय धोकादायक रस्ता मुंबई – पुणे हायवे क्रॉस करावा लागतो तो अतिशय धोकादायक असल्याने या पुर्वी तेथे अपघात झाले आहेत. तसेच त्यांना रस्ता क्रॉस करण्यासाठी टिळक चौकात यावे लागते ते अंतर लांब तसेच तेथे मोठया प्रमाणात ट्रॅफिक असल्याकारणाने तेथे अजुनच धोका वाढतो आहे. त्यामुळे जर मुंबई – पुणे रस्त्यावर रोड क्रॉस

करण्यासाठी फ्लाय ओव्हर (पादचारी रस्ता) बनविणे अत्यंत आवश्यकता आहे. तरी फ्लाय ओव्हर (पादचारी रस्ता) बनविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्र.१६ विषय क्र.२
दि.११/९/२०१५ विभाग:-

**सुचक**:- मा.जाधव साधना रामदास अनुमोदक:- मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

संदर्भ:- मा. जाधव साधना रामदास व मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित यांचा दि.११/९/२०१५ चा प्रस्ताव

विषय:- प्रभाग क्र.५ मधील से.क्र.१३ हा भाग फ प्रभागात येतो. तेथे अनेक वर्षापासुन रहिवासी राहतात तरी त्या भागाचे **"राजमाता जिजाऊ नगर"** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्र.१७ विषय क्र.३
दि.११/९/२०१५ विभाग:-

**सुचक**:- मा. मा.बो-हाडे शुभांगी संजय अनुमोदक:- मा.साने स्वाती प्रमोद

संदर्भ:- मा.मंगलाताई अशोक कदम यांचा दि.११/९/२०१५ यांचा प्रस्ताव

विषय:- प्रभाग क्र.९ संभाजीनगर येथील अम्ब्रेला गार्डन मधील नविन दवाखान्याचे नामकरण करणेबाबत

प्रभाग क्र.९ संभाजीनगर येथील अम्ब्रेला गार्डन मधील नविन इमारतीमध्ये महापालिकेमार्फत दवाखाना सुरु करण्याचे नियोजन केले आहे. सदर नियोजीत दवाखान्यास **"साईअम्ब्रेला डिस्पेन्सरी"** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

मा.अध्यक्षा यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-

सौ.शुभांगी संजय बो-हाडे
अध्यक्षा
फ क्षेत्रीय कार्यालय

जा.क्र.फक्षेका/सभा/कावि/ १६० /२०१५
दि. ११ /९/२०१५

सही/-

प्रशासन अधिकारी
सचिव (सभाशाखा)
फ क्षेत्रीय कार्यालय

प्रत:- सर्व संबंधित शाखा प्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना